03-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/2/2025 11:02 PM Page 1



## निवडक



### एशियन ॲथलेटिक्समध्ये भारताला १८ पदके

**– ८ सुवर्ण, ७ रौप्य, ३ कांस्य**

**गुमी, दि. २ :** दक्षिण कोरियातील गुमी येथे सुरू असलेल्या एशियन ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत भारताने आतापर्यंत १८ पदके जिंकली आहेत. यात ८ सुवर्ण, ७ रौप्य, ३ कांस्य पदकांचा समावेश आहे.
एशियन ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ – भारतीय विजेते
गुलवीर सिंग – पुरुषांची १0000 मी. – सुवर्ण
टीम इंडिया (संतोष कुमार, रुपल, विशाल आणि सुभा व्यंकटेशन) – मिश्र ४–४00 मीटर रिले – सुवर्ण, अविनाश साबळे – पुरुषांची ३000 मीटर स्टीपलचेस – सुवर्ण,
ज्योती याराजी – महिलांची १00 मीटर अडथळा शर्यत – सुवर्ण, टीम इंडिया (जिस्ना मॅथ्यू, रुपल चौधरी, कुंजा रजिथा आणि सुभा वेंकटेशन) – महिलांची ४–४00 मीटर रिले – सुवर्ण, गुलवीर सिंग – पुरुषांची ५000 मी. – सुवर्ण, पूजा सिंग – महिलांची उंच उडी – सुवर्ण, नंदिनी अगासरा – हेप्टाथलॉन – सुवर्ण, रुपल चौधरी – महिलांची ४00 मी. – रौप्य, पूजा – महिलांची १५00 मी. – रौप्य, प्रवीण चित्रवेल – पुरुषांची तिहेरी उडी – रौप्य, तेजस्विन शंकर – डेकॅथलॉन – रौप्य, टीम इंडिया (जय कुमार, धर्मवीर चौधरी, मनू टीएस आणि विशाल टीके) – पुरुषांची ४–४00 मीटर रिले – रौप्य, ॲंसी सोजन – महिलांची लांब उडी – रौप्य, पारुल चौधरी – महिलांची ३000 मीटर स्टीपलचेस – रौप्य, सर्व्हिन सेबास्टियन – पुरुषांची २0 किमी धावण्याची शर्यत – कांस्य, युनुस शाह – पुरुषांची १५00 मी. – कांस्य, शैली सिंग – महिलांची लांब उडी – कांस्य

# पंजाब ११ वर्षांनंतर आयपीएल फायनलमध्ये

## अय्यरची 'कप्तानी' खेळी | अहमदाबादमध्ये मुंबईचे 'बॅड लक'

**अहमदाबाद, दि. २ :**

येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील क्वालिफायर–२ सामन्यात पंजाब किंग्जने ५ विकेटने विजय मिळवला आहे. यासह पंजाबने अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केले असून संघाला आता जेतेपदाच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुशी भिडावे लागेल. आयपीएलचा अंतिम सामना 0३ जून रोजी याच मैदानावर होणार आहे.



मुंबईच्या २०० पार धावा : पावसामुळं दोन तास उशिरा सुरू झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करायला आलेल्या मुंबईनं निर्धारित २0 षटकांत सहा बाद २0३ धावा केल्या. फलंदाजी करताना अवघ्या दुसऱ्या षटकात मुंबईला रोहित शर्माच्या (८) रूपानं संघाला मोठा धक्का बसला. मात्र यानंतर जॉनी बेयरस्टो (३८), सूर्यकुमार यादव (४४), तिलक वर्मा (४४), नमन धीर (३७) यांच्या उपयुक्त आणि आक्रमक खेळीनं संघाला २00 हून अधिक धावांचा टप्पा गाठता आला. पंजाबकडून गोलंदाजीत आजमतुल्ला ओमरझाईनं सर्वाधिक २ विकेट घेतल्या तर काईल जेमिन्सन, विजयकुमार वैश्यक, युझवेंद्र चहल आणि मार्कस स्टोइनिस यांनी प्रत्येकी १–१ विकेट घेतली.

कर्णधार अय्यरचे नाबाद अर्धशतक : मुंबईनं दिलेल्या २0४ धावांच्या लक्षाचं पाठलाग करायला उतरलेल्या पंजाबसाठी प्रभसिमरन सिंगनं (६ धावा) मोठी खेळी केली नसली तरी, त्याच्याशिवाय जोस इंग्लिश (३८), श्रेयस अय्यर (८७) आणि नेहल वधेरा (४८) यांनी चांगली फलंदाजी दाखवली. इंग्लिशने घातक गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या एका षटकात २0 धावा काढल्या. त्याने सामन्यात एकूण ३८ धावांचं योगदान दिले. तर वधेरानं २९ चेंडूत ४८ धावांची खेळी केली. त्यानं पंजाब संघाला लक्ष्याच्या जवळ नेलं. श्रेयस अय्यर क्रीजच्या एका टोकावर ठाम राहिला. त्याने २७ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. अय्यरनं ४१ चेंडूत ८७ धावा काढल्या, ज्यात ५ चौकार आणि ८ षटकारांचा समावेश होता. मुंबईचे गोलंदाज या सामन्यात अपयशी ठरले आणि त्यांना चांगली कामगिरी करता आली नाही. मुंबईसाठी अश्विनी कुमारनं सर्वाधिक दोन बळी घेतले.

पावसामुळे सामन्याला उशिरा सुरुवात : या सामन्यात पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यानंतर सामन्याच्या निर्धारित वेळेवर खेळाडू मैदानात आले असतानाच अचानक पावसाला सुरुवात झाली. यानंतर दोन तास पावसाचा लपंडाव सुरुच राहिला परिणामी सामना 0७:३0 ऐवजी दोन तास उशिरा म्हणजेच 0९:३0 नंतर सुरु करावा लागला.

# हेनरिक क्लासेनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती..!

**नवी दिल्ली, दि. २ :**



दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू हेनरिक क्लासेनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. तो म्हणाला की देशाचे प्रतिनिधित्व करणे हा त्याच्यासाठी सर्वात मोठा सन्मान होता आणि निवृत्तीचा निर्णय त्याच्यासाठी खूप कठीण होता. क्लासेनने दक्षिण आफ्रिकेसाठी वनडे सामन्यात पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळला. त्याने त्याच्या संपूर्ण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत ३,२४५ धावा केल्या.

हेनरिक क्लासेनने इंस्टाग्रामवर त्याच्या कुटुंबासोबतचा एक फोटो शेअर केला आहे, ज्याद्वारे त्याने क्रिकेट सोडत असल्याची घोषणा केली आहे. तो म्हणाला, देशाचे प्रतिनिधित्व करणे माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे, मी लहानपणापासूनच हे स्वप्न पाहत होतो. क्लासेनने असेही म्हटले आहे की या शानदार क्रिकेट कारकिर्दीत तो अशा लोकांनाही भेटला, ज्यांच्यासोबत त्याचे आयुष्य बदलले.

हेनरिक क्लासेनने निवृत्तीचे कारण सांगताना म्हटले आहे की, मला आता आशा आहे की मी कुटुंबासोबत अधिक वेळ घालवू शकेन कारण निवृत्तीनंतर मी असे करू शकेन. क्लासेनने क्रिकेटमध्ये या टप्प्यावर पोहोचण्यास मदत करणाऱ्या सर्व लोकांचे आभार मानले आहेत.

हेनरिक क्लासेनने गेल्या वर्षी जानेवारीमध्ये कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याने त्याच्या रेड–बॉल कारकिर्दीत फक्त ४ सामने खेळले ज्यामध्ये तो फक्त १0४ धावा करू शकला. आता त्याने वनडे आणि टी–२0 फॉरमॅटलाही निरोप दिला आहे. त्याच्या ६0 सामन्यांच्या वनडे कारकिर्दीत त्याने ४ शतकांसह ११ अर्धशतके झळकावत २,१४१ धावा केल्या. टी२0 मध्ये त्याच्या विस्फोटक फलंदाजीसाठी त्याला ओळख मिळाली, जिथे त्याने दक्षिण आफ्रिकेसाठी ५८ सामन्यांमध्ये १,000 धावा केल्या.

हेनरिक क्लासेनने आयपीएल २0२५ मध्ये सनरायझर्स हैदराबादसाठी आतापर्यंतचा शेवटचा सामना खेळला आहे. त्याच्या शेवटच्या सामन्यात त्याने केकेआरविरुद्ध नाबाद १0५ धावांची आक्रमक शतकी खेळी केली. त्याच वेळी, त्याने दक्षिण आफ्रिकेसाठी शेवटचा सामना मार्च २0२५ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध खेळला गेला.



# रॉजर बिन्नी होणार निवृत्त!

**नवी दिल्ली, दि. २ :**

## आता बीसीसीआयचा नवा अध्यक्ष कोण?

भारत आणि इंग्लंड यांच्यात ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळली जाणार आहे. बीसीसीआयचे (बीसीसीआय) विद्यमान अध्यक्ष रॉजर बिन्नी या मालिकेच्या मध्यात निवृत्त होतील. अशा परिस्थितीत बोर्डाला एक नवीन अध्यक्ष मिळेल. मीडिया रिपोर्ट्सनुसार, राजीव शुक्ला बीसीसीआयचे नवे अध्यक्ष असतील. बिन्नी यांनी २0२२ मध्ये बीसीसीआय अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. पण आता ते २0२५ मध्ये निवृत्त होण्यास तयार आहेत.

रॉजर १९ जुलै रोजी निवृत्त होणार आहेत. या प्रकरणात, त्यांच्या जागी बोर्डाला नवीन अध्यक्षाची नियुक्ती होईल. वृत्तानुसार, राजीव शुक्ला हे बीसीसीआयचे नवे अध्यक्ष असतील. त्यांना कार्यकारी अध्यक्ष बनवले जाऊ शकते. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले आहे की, १९ जुलै रोजी रॉजर बिन्नी यांचा कार्यकाळ संपल्यानंतर राजीव शुक्ला यांना बीसीसीआयचे कार्यवाहक अध्यक्ष बनवले जाऊ शकते. या वर्षाच्या अखेरीस सप्टेंबर महिन्यात नवीन बीसीसीआय अध्यक्ष निवडले जातील.

राजीव शुक्ला हे अनेक वर्षांपासून बीसीसीआयशी संबंधित आहेत. त्यांना अनेक मोठ्या पदांवरही नियुक्ती देण्यात आली आहे. ते सध्या बीसीसीआयचे उपाध्यक्ष म्हणून काम करत आहेत. आता राजीव शुक्ला यांची जबाबदारी वाढणार असल्याचे दिसते. याशिवाय राजीव शुक्ला हे इंडियन प्रीमियर लीगचे अध्यक्षही राहिले आहेत.

रॉजर बिन्नी यांच्याबद्दल बोलायचे झाले तर, त्यांनी पहिल्यांदा १८ ऑक्टोबर २0२२ रोजी बीसीसीआय अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. याआधी ते २0१९ ते २0२२ पर्यंत कर्नाटक क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होते. रॉजर निवृत्त झाल्यावर भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. मालिकेतील पहिला सामना २0 जूनपासून खेळला जाईल, तर शेवटचा सामना १0 जुलैपासून खेळला जाईल.

# डी. गुकेशने इतिहास रचला!

## मॅग्नस कार्लसनला भारताच्या डी. गुकेशने चारली पराभवाची धूळ

**ओस्लो, दि. २ :**

भारतीय बुद्धिबळपटू डी. गुकेशने इतिहास रचला आहे. गुकेशने शानदार कामगिरी करत नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा २0२५ च्या सहाव्या फेरीत पाच वेळा विश्वविजेता असलेल्या मॅग्नस कार्लसनचा पराभव करून शानदार विजय नोंदवला. हा एक विश्वविजेता मॅग्नस कार्लसनला क्लासिकल फॉरमॅटमध्ये धक्का देणारा पराभव दिला. गुकेशच्या करियरमध्ये प्रथमच, गुकेशने क्लासिकल टाइम कंट्रोलमध्ये कार्लसनला हरवण्यात यश मिळवले आहे. गुकेशसाठी हा केवळ एक विजय नव्हता, तर करिअरमधील एक महत्त्वाची कामगिरी होती. या निकालासह, स्पर्धेत गुकेश आणि कार्लसन यांच्यातील हेड टू हेड स्कोअर १–१ असा बरोबरीत आहे.

चॅम्पियन कार्लसनने सुरुवातीपासून आघाडी घेतली होती. मात्र भारताच्या गुकेशने संयम, आत्मविश्वास दाखवत उत्तम बचाव केला. शेवटच्या टप्प्यात कार्लसनने एक चूक केली आणि गुकेशने त्या क्षणी तुच्या चुकीला अगदी अचूक उत्तर देत सामना स्वतःच्या बाजूने वळवला.

या विजयामुळे गुकेशने कार्लसनविरुद्ध आपला 'हेड टू हेड' स्कोअर १–१ ने बरोबरीत नेऊन ठेवला आहे. दोघांमधील ही स्पर्धा अधिकच रंजक ठरली. शिवाय गुकेशने अशा खेळाडूविरुद्ध क्लासिकल प्रकारात मिळवलेला हा विजय, त्याच्या कारकिर्दीत एक मैलाचा दगड ठरली आहे.



सामना संपल्यानंतर कार्लसनच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसून आली. त्याने शेवटची मूव्ह करून समाना संतापात टेबलवर मुक्का मारला, ज्यामुळे त्याचे मोहरे खाली पडले. हा पराभव त्याला जोरात लागला आहे हे त्याच्या रिएक्शनमधून दिसून आले. राउंड ६ पूर्वी कार्लसन ९.५ गुणांसह अव्वल स्थानी होता, त्याच्यामागोमाग फॅबियानो कारुआना ८ आणि हिकारू नाकामुरा ६.५ गुणांसह होते. मात्र गुकेशच्या या विजयामुळे अंतिम टप्प्यात स्पर्धेचा थरार आणखी वाढला आहे. आता उरलेल्या काही फेऱ्यांमध्ये विजेतेपदासाठी स्पर्धकांमध्ये जोरदार चुरस पाहायला मिळणार आहे.

# वनडे क्रिकेटमध्ये जो रूटने रचला इतिहास!

**नवी दिल्ली, दि. २ :**

इंग्लंडचा दिग्गज फलंदाज जो रूटने वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेतील दुसऱ्या वनडे सामन्यात एक मोठा रेकॉर्ड केला आहे. जो रूट आता इंग्लंडच्या वनडे इतिहासात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे. हा विक्रम त्याच्या नावावर करण्यासाठी त्याला ४२ धावांची आवश्यकता होती आणि १७ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर जस्टिन ग्रीव्हजच्या चेंडूवर त्याने एक धाव घेतली तेव्हा त्याने हा विक्रम आपल्या नावावर केला.



इंग्लंडचा विश्वचषक विजेता इऑन मॉर्गनने २२५ सामन्यांच्या २0७ डावांमध्ये ३९.७५च्या सरासरीने ६,९५७ धावा केल्या आहेत. या सामन्यापूर्वी जो रूटने १७८ सामन्यांच्या १६७ डावांमध्ये ६,९१६ धावा केल्या होत्या. यासह, जो रूट आता वनडे सामन्यात सर्वात जलद ७,000 धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत सामील झाला आहे. रूट या यादीत पाचव्या स्थानावर आहे आणि त्याने सौरव गांगुली, रोहित शर्मा, ब्रायन लारा सारख्या दिग्गजांना मागे टाकले आहे. रूटने १६८ डावांत ७,000 धावा केल्या.

या यादीत हाशिम आमला पहिल्या स्थानावर आहे, ज्याने १५0 डावांत हा रेकॉर्ड केला. तर केन विल्यमसन दुसऱ्या स्थानावर आहे, ज्याने १५९ डावांत हा रेकॉर्ड केला. विराट कोहली तिसऱ्या स्थानावर आहे आणि एबी डिव्हिलियर्स या यादीत चौथ्या स्थानावर आहे. कोहलीने १६१ डावांत हा पराक्रम केला आहे, तर डिव्हिलियर्सने १६६ डावांत हा पराक्रम केला आहे.

सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, कार्डिफमधील सोफिया गार्डन्स येथे खेळलेला सामना इंग्लंडने ३ विकेट्सने जिंकला. वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करताना ८ विकेट्स गमावून ३0८ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून केसी कार्टीने १0३ धावा केल्या. तर शाई होपने ७८ आणि ब्रँडन किंगने ५९ धावा केल्या.

प्रत्युत्तरात इंग्लंड एकेकाळी अडचणीत होते आणि त्यांनी १३३ धावांत पाच विकेट्स गमावल्या होत्या, परंतु जो रूटने एका टोकाला सांभाळले आणि अखेर संघाला विजयाकडे नेले. जो रूट १६६ धावा करून नाबाद राहिला. त्याच्याशिवाय विल जॅक्सने ४९ धावांची खेळी केली. तर हॅरी ब्रूकने ४७ धावा केल्या. इंग्लंडने हा सामना ३ विकेट्सने जिंकण्यात यश मिळवले. इंग्लंडने मालिकेतील पहिला सामना २३८ धावांनी जिंकला होता. दुसऱ्या सामन्यातील विजयासह त्यांनी २–0 अशी अजिंक्य आघाडी घेतली आहे.

# मुंबई इंडियन्सचा महागडा रिप्लेसमेंट!

**▶ प्रत्येक धावेसाठी मोजावे लागले तब्बल ६ लाख १७ हजार ६४७ रुपये?**

**मुंबई, दि. २ :**

यंदाचा आयपीएल हंगाम आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. रविवारी (१ जून) मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्ज यांच्यात झालेल्या क्वालिफायर २ सामन्यात मुंबई इंडियन्सचा धुव्वा उडवत पंजाब किंग्जने आयपीएल २0२५च्या फायनलमध्ये धडक मारली. यादरम्यानच आयपीएल हा केवळ क्रिकेटचा नाही तर पैशांचाही खेळ आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

यंदाच्या हंगामात मुंबई इंडियन्सने अनेक स्टार खेळाडूंना संधी दिली होती. दरम्यान महत्त्वाच्या प्लेऑफ सामन्यांसाठी मुंबईने इंग्लंडच्या जॉनी बेअरस्टोला रिप्लेसमेंट प्लेअर म्हणून ५ कोटी २५ लाख रुपयांना करारबद्ध केले होते. मात्र, त्याची कामगिरी पाहता मुंबई इंडियन्सला प्रत्येक धावेसाठी किती रूपये मोजावे लागले याबद्दल आपण जाणून घेऊयात.



आयपीएल २0२५च्या प्ले–ऑफमध्ये मुंबई इंडियन्ससाठी जॉनी बेअरस्टोने २ महत्त्वपूर्ण सामने खेळले. या दोन्ही सामन्यांमध्ये त्याने मिळून केवळ ८५ धावा केल्या. त्याच्या या कामगिरीचा आर्थिक हिशोब मांडल्यास, मुंबई इंडियन्सने त्याला प्रत्येक सामन्यासाठी २ कोटी ६२ लाख ५0 हजार रुपये मोजले आहेत.

याहूनही अधिक धक्कादायक बाब म्हणजे, त्याने केलेल्या प्रत्येक धावेसाठी मुंबई इंडियन्सला प्रचंड मोठी रक्कम मोजावी लागली आहे. बेअरस्टोने केलेल्या ८५ धावांसाठी मुंबईने एकूण ५ कोटी २५ लाख रुपये खर्च केले. याचा सरळ अर्थ असा की, मुंबई इंडियन्सने जोनी बेअरस्टोला त्याच्या प्रत्येक धावेसाठी तब्बल ६ लाख १७ हजार ६४७ रुपये दिले आहेत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २७१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 271 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .